मुख्य मंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

Chief Minister
Maharashtra

**दिनांक २० जानेवारी, २०१४**

# आवाहन

**महाराष्ट्र सावकारी (नियमन) अध्यादेशावरील पुस्तिकेचे ग्रामसभेमध्ये वाचन करण्याबाबत**

महाराष्ट्र हे देशातील पुरोगामी राज्य असून शेतकऱ्यांच्या हितासाठी व प्रगतीसाठी कटिबध्द आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पतपुरवठयात देशात आघाडीवर असून या संरचनेद्वारे शेतकऱ्यांची आर्थिक गरज भागविण्यात येत आहे. तरी देखील काही अपरिहार्य कारणास्तव काही शेतकरी / शेतमजूरांना सावकाराकडून कर्ज घेण्याची गरज भासते. अशा परिस्थितीत सावकाराकडून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ नये म्हणून राज्यात सावकारी व्यवसायाचे मुंबई सावकारी अधिनियम, १९४६ नुसार नियमन करण्यात येत होते. मात्र या कायद्यातील तरतुदी पुरेशा व प्रभावी ठरत नसल्यामुळे सावकाराकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक नियंत्रित करणे अडचणीचे होत होते. सावकाराने अवैधरित्या कर्जदार शेतकऱ्यांची मालमत्ता हडप करणे, कर्जावर अवास्तव दराने व्याज आकारले जाणे यावर पुरेसे निर्बंध आणता येत नव्हते. सावकारीतील गैरप्रकार उघडकीस आल्यास या अपराधापोटी लावली जाणारी शिक्षा अथवा दंड याबाबतची तरतूद सावकारांवर जरब बसण्याइतपत पुरेशी नव्हती.

राज्यातील सावकारी नियमनासाठी एक सुधारित व व्यापक तरतुदी असलेला कायदा तयार करुन लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार महाराष्ट्र सावकारी (नियमन) अध्यादेश, २०१४ हा दि. १६/१/२०१४ पासून राज्यात लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील महत्वाच्या तरतुदींची संक्षिप्त माहिती देणारी एक पुस्तिका सहकार विभागामार्फत तयार करण्यात आली आहे.

राज्यात दरवर्षी प्रजासत्ताक दिनानिमित्त दि. २६ जानेवारी या दिवशी प्रत्येक ग्रामपंचायतीच्या स्तरावर ग्रामसभेचे आयोजन करण्यात येते. या सभेला शेतकरी / ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित असतात. या राष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून ग्रामसभेत सावकारी नियमन अध्यादेशातील तरतुदीं विषयीच्या या पुस्तिकेचे वाचन केले गेल्यास शेतकऱ्यांना नवीन अध्यादेशातील तरतुदींची तोंड-ओळख होऊन त्यांच्यात या तरतुदींविषयी जागृती होऊन सावकारापासून आर्थिक पिळवणूकीस प्रतिबंध होण्यास मदत होणार आहे. सावकारी व्यवसायाचे सकारात्मक दृष्टीने नियमन व्हावे, शेतकरी / शेतमजूर व सावकार यांच्यात सोहार्दपूर्ण व विश्वासाचे संबंध प्रस्थापित व्हावेत व शेतकरी / शेतमजूरांचे सावकारी कर्जाच्या अवाजवी व्याज दरापासून संरक्षण व्हावे हा या अध्यादेशाचा उद्देश आहे.

यास्तव आपणांस असे आवाहन करण्यात येत आहे की, प्रजासत्ताक दिनानिमित्त दि. २६ जानेवारी, २०१४ रोजी ग्रामपंचायतीच्या स्तरावर होणाऱ्या ग्रामसभेमध्ये या पुस्तिकेचे वाचन ग्रामसेवक, तलाठी, सहकार विभागाचे क्षेत्रिय अधिकारी यांच्यामार्फत करण्यात यावे व त्यास गावात पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच, या विषयावर सविस्तर चर्चा घडवून आणावी व शेतकरी / ग्रामस्थांमध्ये या कायद्याबाबत व्यापक जनजागृती करावी.

आपल्या ग्रामसभेमध्ये हा उपक्रम यशस्वीरित्या राबविला जाईल अशी मी अपेक्षा करतो व आपणांस या प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा देतो.

**( पृथ्वीराज चव्हाण )**

सरपंच, ग्राम पंचायत (सर्व)